www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

दैं. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 257 वा रविवार दि. ०१ जून २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# हरिनामाच्या गजरात भक्तीच्या मेळाव्याला भव्य प्रारंभ





**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

दानशूर, समाजसेवक आणि माणुसकीचा धर्म अखंड जपणारे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव समितीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'कीर्तन महोत्सवा'ला हरिनामाच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात व भक्तीमय वातावरणात भव्य प्रारंभ झाला.खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाला पनवेल, उरण, कर्जत, खालापूर परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थिती लावली. संत परंपरेचा महिमा आणि अध्यात्मिक वारसा जपणाऱ्या या महोत्सवात नामवंत भजन गायक व कीर्तनकारांनी हजेरी लावत भाविकांना भक्तिरसात विलीन केले. या भक्तिपर्वाचा उद्देश केवळ धार्मिक नसून समाजामध्ये सकारात्मक ऊर्जा आणि संस्कार रुजवण्याचा आहे. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक योगदान आणि त्यांची लोकनेते म्हणून असलेली प्रतिमा या निमित्ताने अनेकांनी गौरवली. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, अध्यात्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात अग्रगण्य आणि दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ०२ जून रोजी ७४ वा वाढदिवस असून ते अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहेत. त्या अनुषंगाने वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमे आयोजित करण्यात आले असून त्याचा शुभारंभ संतांच्या वाणीच्या गोडव्याने झाली. तीन दिवस म्हणजेच ०२ जून पर्यंत हा भव्य स्वरूपात 'कीर्तन महोत्सव' होणार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर दानशूर व्यक्तिमत्व म्हणून संपूर्ण देशात ओळखले जातात. त्यांचे सर्व समाजासाठी योगदान नेहमीच आदर्शवत आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन व अर्थसहाय्य करत त्यांनी सामाजिक बांधिलकी कायम जपली आहे. अध्यात्मिक क्षेत्रातही त्यांचे कार्य महत्वपूर्ण असे आहे, मंदिरांची उभारणी, मंदिराचे जिर्णोद्धार तसेच दिंडीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सढळ हस्ते मदत करत असतात, त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा अध्यात्मिक सोहळा मोठ्या प्रमाणात उत्सव म्हणून साजरा झाला पाहिजे, यासाठी वारकरी संप्रदायातील व्यक्तींनी पुढाकार घेतला. त्या अनुषंगाने वारकरी सांप्रदायातील अनेक गुरुतुल्य व्यक्तींच्या प्रमुख उपस्थितीत या कीर्तन महोत्सवाची सुरुवात हरिनामाच्या गजरात प्रतिमा पुजा, वीणा, टाळ आणि पखवाज पूजनाने झाली. त्यानंतर रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांचे सुश्राव्य भजन संपन्न झाले. पनवेल, उरण, कर्जत, खालापूर परिसरातील ४७ हरिपाठ मंडळांचे सामुदायिक हरिपाठ अखंड भक्तिभावात झाले, यामध्ये वारकरी सांप्रदायातील महिला वर्गाची उपस्थिती मोठ्या प्रमाणात व लक्षणीय होती. त्यानंतर सायंकाळी आदरणीय गुरुतुल्य सत्कारमूर्ती कीर्तनकार महाराजांचा सत्कार सोहळा, आणि त्यानंतर ह.भ. प. उमेश महाराज दशरथे (परभणी) यांचे हरिकीर्तन आयोजित करण्यात आले होते. या महोत्सवाच्या शुभारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, दिबासाहेबांचे चिरंजीव अतुल पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सदगुरु आप्पा माऊली यांचे चिरंजीव ह. भ. प. विष्णु दादा मांगरुळकर, संत तुकाराम महाराज पायी कोकण दिंडी अध्यक्ष ह. भ. प. पद्माकर महाराज पाटील, बांठिया सप्ताह अध्यक्ष ह. भ. प. धाऊशेठ पाटील, राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. सुरेश महाराज पाटील, भजनसम्राट ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी, महाराष्ट्र वारकरी महामंडळ रायगड जिल्हाध्यक्ष ह. भ. प. पुंडलिक महाराज फडके, रायगड भूषण ह. भ. प. नारायणबुवा महाराज, अनंतबुवा महाराज पाटील, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, उपमहापौर चारुशीला घरत, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका सुशीला घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, अमित जाधव, माजी नगरसेवक जयंत पगडे, मनोहर म्हात्रे, गणेश कडू, अजय बहिरा, एकनाथ गायकवाड, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, सुनील बहिरा, मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, भूपेंद्र पाटील, विकास घरत, कामगारनेते प्रभुदास भोईर, जितेंद्र म्हात्रे, प्रवीण पाटील, हॅप्पी सिंग, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, रोहित जगताप यांच्यासह वारकरी संप्रदायातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चौकट- "कीर्तन महोत्सव" म्हणजे कीर्तनाच्या माध्यमातून धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जागर करणारा एक भव्य कार्यक्रम. हा एक पारंपरिक उत्सव आहे जो महाराष्ट्रात आणि इतर मराठी भाषिक भागात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्यामुळे त्याचे महत्व आणि मान्सून पूर्व पावसाची हजेरी लक्षात घेता येथे येणाऱ्या वारकरी सांप्रदायातील मंडळींना या भक्तीसंगम मेळाव्यात कोणतीही कमी भासू नये यासाठी आयोजकांकडून उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. किमान तीन हजार लोकांची बैठक व्यवस्था असलेल्या या ठिकाणचा मंडप वॉटरप्रूफ पद्धतीचा उभारण्यात आला आहे. त्याचबरोबरीने या ठिकाणी संतांच्या मूर्ती व प्रतिमा आकर्षक अशा होत्या. मंडपामध्ये संतांच्या आकर्षक मूर्ती व प्रतिमांचे सादरीकरण हे विशेष लक्षवेधी होते. त्या प्रतिमांकडे नजर गेल्यावर भाविकांच्या मनात भक्तिभाव निर्माण होऊन, जणू काही साक्षात दर्शनच झाले आहे, असा अनुभव या ठिकाणी येत आहे.

# उरणमध्ये 'रीडेव्हलपमेंट रॅकेट' सहाय्यक निबंधकांच्या भूमिकेवर संशय!

## गृहनिर्माण सोसायटीच्या सदस्यांमध्ये तीव्र नाराजी

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

उरणमधील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाच्या नावाखाली सुरू असलेले राजकारण आणि व्यवहार सध्या चर्चेचा विषय ठरत आहेत. काही विकासकांकडून गृहनिर्माण सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना आमिषे दाखवून त्यांच्या बाजूने खेचण्याचे प्रयत्न सुरू असून, या व्यवहारात सहायक निबंधक अधिकाऱ्यांनाही हाताशी धरल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे आता त्यांच्या कारभाराची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

शहरात अनेक इमारती धोकादायक अवस्थेत असून त्यांचे पुनर्विकास प्रकल्प सुरू आहेत. मात्र या कामांसाठी विकासक नगरपालिका प्रशासन व सहायक निबंधक अधिकाऱ्यांशी साटेलोट करून नियम मोडून इमारती उभारत असल्याची तक्रार आहे. काही ठिकाणी तर विकासकांनी लाखोंच्या 'खिरापती'च्या बदल्यात प्रकल्प मिळवले आहेत, असा आरोप होत आहे विशेष म्हणजे काही इमारतींमध्ये सोसायटी निवडणुकांपूर्वीच जुने रहिवासी जे अनेक वर्षांपासून सदनिकाधारक आहेत. त्यांचे



सदस्यत्व अमान्य ठरवण्यात आले, तर अलीकडेच मालमत्ता खरेदी केलेल्यांना सदस्यत्व दिले गेले. ही प्रक्रिया पूर्णतः अपारदर्शक आणि नियमनविरुद्ध असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे.या संदर्भात सहाय्यक निबंधक कार्यालयाकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या असूनही, त्यावर योग्य ती कारवाई न करता उलट तक्रारदारांशी उर्मट वर्तन केल्याचेही आरोप समोर आले आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर संताप वाढला असून, नागरिक व विरोधकांनी सहायक निबंधक अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी व्हावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

# भारज बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी जाफ्राबाद्ज्ञा**
**नेश्वर कु निकाळजे ,**



जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी पुरस्कार सन्मानित करण्यात आला यावेळी अलका राजेंद्र कतोरे आणि रेखा दौलत साळवे यांना शाल सन्मानपत्र ट्रॉफी रोख रक्कम ५०० रुपये बक्षीस देण्यात आले

यावेळी सौ शकुंतलाबाई रामचंद्र तेलंग्रे सरपंच सी आय पठाण साहेब ग्रामसेवक रहीम टेलर उपसरपंच माजी सरपंच तुळशीराम पायघन समाधान दामघर ग्रामपंचायत सदस्य, शंकर महाराज कोथलकर, रामचंद्र तेलंग्रे , शारदा विजय देशमुख अंगणवाडी मदतनीस , सुनिता अनंता शिंदे अंगणवाडी सेविका ,सदाशिव खरात, शकुंतलाबाई गायकवाड, बंडू महाराज, महावितरणचे कर्मचारी अशोक देशमुख, ग्रामपंचायत ऑपरेटर गजानन तेलंग्रे, गायकवाड, पंडित बोडखे, समाधान डब्बे, अमोल खरात , पुंजाजी गायकवाड, सांडू खरात, अमोल खरात, योगेश देशमुख, संपत देशमुख, आदी गावकरी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दृष्य सत्य

## जनतेच्या नजरेतून
### शासनाच्या दरबारात

**पाटोदा पुलाचा खड्डा-काळ! रस्ता आहे की खड्डा?**
**प्रशासनाचे मौन, जनतेची कुजबुज!**



पैठण-पंढरपूर पालखी मार्गावरील पाटोदा शहरातील मांजरा नदी पुलाचा रस्ता मोठ्या खड्ड्यांनी व्यापलेला आहे. खड्ड्यांमुळे वाहनधारकांना व पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रस्त्यांवरील चिखल आणि खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

स्थळः पाटोदा
शेख महेशर ताहेर
पाटोदा तालुका प्रतिनिधी, दैनिक युवक आधार.

**"रस्ता आहे की खड्डा?"**
**असा सवाल सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.**


**या दृष्य सत्याकडे प्रशासन केव्हा लक्ष देणार?**

# जऊळका व इतर खेड्यासह पोलिसांच्या नाकावर टिचून वरली मटका खुलेआम सुरू. जऊळका पोलीस स्टेशनचे अर्थपूर्ण दुर्लक्ष.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

वाशिम जिल्ह्यात मालेगाव तालुक्यात जऊळका पोलीस स्टेशन अंतर्गत येणारी खेडे व जऊळका गावात येथे वरली मटका व जुगाराचे प्रचंड प्रमाण वाढले असून दररोज या अवैध धंद्यातून लाखो रुपयाची उलाढाल होत असल्यामुळे स्थानिक पोलीस स्टेशनवर सामान्य नागरिकांचा रोष आहे सामान्य जनतेत या वरली मटक्याबद्दल जवळका व इतर खेडेगावात खुलेआम चर्चा रंगत आहे 3000 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावाला अनेक आजूबाजूची खेडी जोडलेली असून दैनंदिन खरेदीसाठी व बँक आणि तलाठी कार्यालयातील कामासाठी शेतकरी कष्टकरी व बेरोजगार तरुण मोठ्या संख्येने येत असतात. दुसरी गोष्ट म्हणजे रेल्वे स्टेशन असणारा गाव खूप चर्चेत आहे. ही बाब हेरून स्थानिक नागरिकाने अवैध धंद्याचा मोठा बाजार मांडलेला आहे. या परिसरातील नागरिक उन्हाळी हंगामात कामधंदे नसल्याने आधीच रोजगाराच्या शोधासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतरित झालेला असून जे गावात राहिलेले आहेत त्यांना देशोधडीला लावण्याचा उद्योग या वरली मटक्यावाल्यांनी राजरोसपणे सुरू केला आहे. या भागातील अवैध धंदे बंद करण्यासाठी वरिष्ठ पोलीस प्रशासनाने लक्ष घालण्याची मागणी सामान्य जनतेत होत आहे.

खुल्या बाजारात अवैध धंद्याचे मुक्ताफळ, पण कारवाईचं सूत अजूनही फिरत नाही. जऊळका पोलीस स्टेशन अंतर्गत वरली मटक्याचा महास्फोट. जऊळका पोलीस स्टेशन च अर्थपूर्ण दुर्लक्ष.




# पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातुन अपहरण झालेल्या 3 महिन्यांच्या बाळाची पनवेल शहर पोलीस ठाण्याकडुन 24 तासात सुटका व आरोपीता ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :**

पनवेल रेल्वे स्टेशनच्या परिसरातून 3 महिन्यांच्या बाळाचे अपहरण करणाऱ्या आरोपीला 24 तासात पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेवून सदर बाळ नातेवाईकांच्या ताब्यात दिले आहे. पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाहेरुन 3 महिन्यांच्या बाळाचे कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केले म्हणुन पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा प्रकार हा संवेदनशील व गंभीर स्वरुपाचा असल्याने तात्काळ यातील अपहृत बाळ व आरोपीचा शोध घेणेकामी पनवेल शहर पोलीस ठाण्याकडुन 5 पथके तयार करण्यात आली. सदर पथकाने पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातील सीसीटिव्ही फुटेज तपासले असता एक महिला ही यातील अपहृत बाळासह पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेमध्ये बसताना दिसुन



आली. त्यावरुन सदर आरोपी व अपहृत बाळाचा शोध घेणेकामी कर्जत, लोणावळा, दौंड, पुणे येथे पथके रवाना केली. सदर पथकांनी केलेल्या तपासामध्ये यातील आरोपी ही पोलीसांना गुंगारा देण्यासाठी लोणावळा येथुन रेल्वेने पुन्हा पनवेलच्या दिशेने आल्याचे दिसुन आले. मिळालेल्या माहितीच्या आधारे पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या आजु बाजुच्या पोलीस ठाण्यास गुन्हयाच्या घटनेबाबत माहिती देऊन यातील अपहृत बाळ व आरोपीचा शोध घेणेबाबत कळवण्यात आले होते. गुन्हयाच्या तपासादरम्यान कळंबोली पोलीस ठाण्याचे वपोनि श्री. राजेंद्र कोते यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यास कळवले की, त्यांच्या पोलीस ठाण्याच्या नेमणुकीस असलेल्या सपोनि तृप्ती शेळके या कळंबोली सर्कल कडुन कळंबोली पोलीस ठाण्याकडे येते असताना त्यांना यातील आरोपीता ही अपहृत बाळासह कळंबोली फायर ब्रिगेड जवळ दिसुन आल्याने त्यांनी आरोपीतेस ताब्यात घेऊन अपरहत बाळाची सुटका केली असल्याचे कळवले. त्यावरुन तात्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्याकडील अधिकारी व अंमलदार यांनी कळंबोली पोलीस ठाणे येथुन अपहृत बाळ व आरोपीतेस पनवेल शहर पोलीस ठाणे येथे घेऊन आलेले आहेत. त्यानंतर अपहृत बाळास सुखरुप तिच्या आईच्या ताब्यात दिलेले आहे. यातील आरोपी रोशनी विनोद वागेश्री वय 35 वर्षे, राह पनवेल रेल्वे स्टेशन समोरील झोपडपट्टी, पनवेल ही पनवेल शहर पोलीसांच्या ताब्यात असुन गुन्ह्याचा पुढील तपास चालु आहे. सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मिलींद भारंबे, मा. पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई; संजय ऐनपुरे, मा. पोलीस सह आयुक्त सो, नवी मुंबई; प्रशांत मोहीते सो, पोलीस उपायुक्त सो, परि 02, पनवेल, नवी मुंबई; अशोक राजपुत, मा. सहा. पोलीस आयुक्त सो, पनवेल विभाग, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, पोनि (गुन्हे) शाकीर पटेल, पोनि (प्रशा) अभिजीत अभंग, सपोनि प्रकाश पवार, सपोनि तृप्ती शेळके (नेम- कळंबोली पोलीस ठाणे), पोउपनि विनोद लभडे, पोउपनि अंकुर शेलार, पोउपनि उद्धव सोळंके, पोहवा महेंद्र वायकर, पोहवा अमोल डोईफोडे, पोहवा गंथडे, पोहवा अमोल पाटील, पोहवा बोरसे, पोहवा महेश पाटील, पोशि किरण कराड, पोशि विशाल दुधे, पोशि नितीन कांबळे यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

## पानवडोद बु.येथे माऊली हॉस्पिटल व मेडिकलचा उद्घाटन सोहळा संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** पानवडोद बु ता. सिल्लोड येथे डॉ. कोमल विकास मख यांच्या नविन माऊली हॉस्पिटल व मेडिकलचे उद्घाटन श्री. काशी विश्वेश्वर महादेव मंदिराचे पिठाधीश प.पु.बालयोगी महंत सर्वानंद सरस्वती महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा प्रदेश चिटणीस तथा सिल्लोड सोयगाव विधानसभा नेते सुरेश भाऊ बनकर यांनी उपस्थित राहुन शुभेच्छा दिल्या

यावेळी सरपंच सौ.भाग्यश्री भास्कर फुसे , पंचायत समिती सदस्य अनिल खरात, भाजपा जेष्ठ कार्यकर्ते प्रकाश गाडेकर, भाजयुमो तालुकाध्यक्ष विजय वानखेडे, चेअरमन स्वप्निल मानकर, केळगाव माजी उपसरपंच संतोष जाधव, अंकुश कोठाळे, डॉ श्रीकांत दौड, विकास दौड आदींसह गावकरी मंडळी उपस्थित होते.



# प्रितम म्हात्रे यांनी जपली सामाजिक बांधिलकी

## "नुकसानग्रस्त घरांसाठी जे.एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचा मदतीचा हात"

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

गेले काही दिवस रायगड जिल्ह्यामध्ये ऑरेंज अलर्ट जाहीर केला होता. यादरम्यान पनवेल उरण परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावली होती. ज्यामुळे सामान्य नागरिकांसोबत ग्रामीण भागातील शेतकरी सुद्धा हवालदिल झाला होता. दोन दिवसांपूर्वी मुसळधार वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीमुळे उरण मधील सारडे गावात काही घरांची वाताहात झाली. घर आणि शेतामध्ये पाणी घुसले, काही घरांचे कौल आणि पत्रे सुद्धा सोसाट्याच्या वाऱ्यामुळे उडून गेले. यासंदर्भात स्थानिक प्रशासनाकडून काही ठिकाणी पाहणी करण्यात आली.



शासनाकडून योग्य तो पाठपुरावा करून त्यांना सहकार्य मिळेलच परंतु आपणही समाजाचे काही देणं लागतो या भावनेतून श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून मा.नगराध्यक्ष श्री जे एम म्हात्रे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली एक माणुसकीचा हात म्हणून मा.नगरसेवक श्री.गणेश कडू, मा.सरपंच श्री जितेंद्र म्हात्रे, श्री रामेश्वर आंग्रे, श्री मंगेश अपराज यांनी दुर्घटनाग्रस्त भागातील घरांची पाहणी केली. दुर्घटनाग्रस्त रहिवासीयांची भेट घेऊन शासनाकडून योग्य तो मोबदला मिळवून देण्यासाठी नक्कीच प्रयत्न करू असे आश्वासन दिले. सामाजिक बांधिलकीतून जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून तातडीचे अर्थसहाय्य देऊन त्यांना मदत केली. यावेळी सारडे गावातील श्री.शेखर पाटील यांच्यासोबत ग्रामस्थ उपस्थित होते.

> नैसर्गिक आपत्ती कधीही येऊ शकते अशावेळी शासन नागरिकांसोबत असतेच परंतु शासनाप्रमाणे आपणही आपल्या बांधवां सोबत उभे राहून सामाजिक बांधिलकी जपावी अशी शिकवण मला नेहमीच श्री.जे एम म्हात्रे साहेबांकडून मिळाली आहे. त्याचेच मी आणि माझे सहकारी नेहमीच अनुकरण करत असतो. यापुढेही आवश्यक त्या वेळी आमची जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था नेहमीच दुर्घटनाग्रस्त बांधवांच्या सोबत राहील
>
> **प्रितम जनार्दन म्हात्रे**
> **मा.अध्यक्ष**
> **जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था.**

## चिचोंडी पाटील येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**बाळासाहेब रकटाटे**
**आष्टी प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील चिचोंडी पाटील येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त गावातील आरोग्य सेविका यांना उत्कृष्ट कामाबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले .नाविन्यपूर्ण उपक्रम चिचोंडी पाटील ग्रामपंचायत ने राबविला आहे. यामध्ये सविता संजय खराडे कल्पना महादेव ठोंबरे छाया चंद्रकांत पवणे आरती दीपक कांबळे रसिका निलेश पंडित यांनाआरोग्य विभागात उत्कृष्ट, काम केल्याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन व शाल,श्रीफळ,फेटा,ट्रॉफी व रोख रक्कम देऊन सन्मानित केले. यावेळी गावातील सर्व आजी-माजी पदाधिकारी ,ज्येष्ठ नागरिक,ग्रामस्थ बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## प्रत्येक कर्मचारी एक कलावंत – अशोक सराफ

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका कर्तव्यदक्ष आणि नावाजलेली संस्था आहे. या संस्थेत जितके हुशार, कर्तव्यदक्ष कर्मचारी आहेत, तितकेच हरहुन्नरी कलाकारही या कर्मचाऱ्यांमध्ये दडलेले आहेत. रोजचे काम सांभाळून आपल्यातील कला सादर करणे हे खूप मोठे आव्हान आहे. तुमच्यातील कलाकार असाच जिवंत ठेवा आणि आयुष्याचा आनंद घेत राहा, असे प्रतिपादन पद्मश्री तथा महाराष्ट्रभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी केले.

बृहन्मुंबई महानगरपालिका कामगार विभागाच्या विद्यमाने आयोजित ५३ व्या आंतरविभागीय खात्यांतर्गत नाट्यस्पर्धा २०२४ - २५ चा पारितोषिक वितरण समारंभ पद्मश्री व महाराष्ट्रभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या हस्ते विलेपार्ले येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

उप आयुक्त (परिमंडळ १) डॉ. संगीता हसनाळे, उप आयुक्त (वित्त) प्रशांत गायकवाड, माजी उप आयुक्त किशोर क्षीरसागर आदीची उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना सराफ म्हणाले की, मी अनेक कार्यक्रमांना जातो. वेगवेगळी स्नेहसंमेलने पाहतो. परंतु इतका रेखीव आणि नियोजनबद्ध कार्यक्रम मी याआधी पाहिला नाही. कर्तव्याची जाणीव असलेला प्रत्येक कर्मचारी जितका आपल्या कामाला न्याय देतो, तितकाच त्याने आज या रंगमंचावर आपल्या कलेला देखील न्याय दिला.

महानगरपालिकेत गुणी आणि कलासक्त कलावंत कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेचे सतत सहकार्य असते, असे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी सांगितले.

सर्व कर्मचारी गुणी आहेत. त्यांची उत्कृष्ट नाटके सादर होतात. पालिका एक विस्तृत कुटुंब आहे. यातील प्रत्येकाच्या प्रतिभेचा गौरव केला जातो, असे डॉ. जोशी यांनी सांगितले.

### पावसाची विश्रांती आणि...



पावसाने घेतलेल्या विश्रांतीनंतर वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील सांताक्रूझ पुलावरील खड्डा पालिका कर्मचाऱ्यांनी बुजवला. (छायाचित्र - विजय गोहिल)



मलबार हिल येथील मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोरील खड्डा कायम आहे.

## प्लंबर नव्हे, ते तर 'जल अभियंता' !

### मंगल प्रभात लोढा यांची सूचना

**मुंबई :** महाराष्ट्र सरकार प्लंबरना 'जल अभियंता' म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेण्याचा विचार करत आहे, असे राज्यमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

नाशिकमध्ये पत्रकारांशी बोलताना, राज्याचे कौशल्य विकास मंत्री लोढा म्हणाले की, अंतिम निर्णय घेण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली जाईल.

सरकार प्लंबरचा दर्जा वाढवून एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्याची तयारी करत आहे. त्यांना लवकरच जल अभियंता म्हणून संबोधले जाऊ शकते. समाजातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेण्याच्या उद्देशाने हे पाऊल आहे. काही व्यवसायांची नावे बदलून कामगारांना अधिक आदर देण्याचा आमचा मानस आहे. हा प्रतीकात्मक बदल त्यांच्या कौशल्यांना आणि सार्वजनिक जीवनात त्यांच्या भूमिकेला ओळखण्यास मदत करेल, असे लोढा यांनी ठामपणे सांगितले.

त्यांच्या भेटीदरम्यान भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधणारे लोढा म्हणाले की, नामकरणात प्रस्तावित फेरबदल हा विविध व्यवसायांमधील व्यक्तींचा दर्जा उंचावण्याच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग आहे.

शहरे आणि संस्थांची नावे बदलण्याच्या मोठ्या राष्ट्रीय ट्रेंडच्या पार्श्वभूमीवर ही कल्पना आली आहे, जरी लोढा म्हणाले की यावेळी लक्ष केंद्रित करणे ठिकाणांवर नाही तर व्यवसायांवर आहे.

## रामदास आठवले अमेरिका दौऱ्यावर

**मुंबई :** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले २ जूनला अमेरिका दौऱ्यावर रवाना होणार आहेत. एकूण ९ दिवसांचा त्यांचा हा दौरा असणार आहे. अमेरिकेत आयोजित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी आठवले यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

## आष्टी तालुक्यातील एकल महिलांचा सर्वे करण्यात यावा एकल महिलांना शासकीय योजनांचा जास्तीत जास्त फायदा मिळावा.सुरेश गांजुरे यांची आमदार सुरेश ( आण्णा )धस यांना दिले निवेदन.

दैनिक युवक आधार
बीड आष्टी प्रतिनिधी



:- मारुती सत्रे आष्टी तालुक्यातील नवे तर पूर्ण राज्यामधील एकल महिलांचा सर्वे करण्यात यावा.कोरोना काळा मध्ये कोणी आपला पती गमावला तर कोणी मुलगा, त्यामुळे तालुक्यातील नव्हे तर पूर्ण राज्यांमधी एकल महिलांचा उदरनिर्वाह,मुला मुलींचे शिक्षण व सासू-सासरे,आई वडील अशा अनेक मोठ्या जबाबदाऱ्या त्यांच्या पुढे आहेत. शासनाने निराधारांना आधारवा द्यावा, व शासन दरबारी या प्रश्नावर गंभीर दखल घ्यावी. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त मतदार संघातील आमदार सुरेश ( आण्णा धस ) यांच्याकडे संत सावता महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सुरेश गांजुरे यांनी निवेदन दिले.

# ऑपरेशन 'सिंदूर"चा अनुभव लोणवाडी येथील सैनिक माणिक

## एकनाथ सुलताने यांच्याकडून ऐकलेला अभिमानास्पद - सुरेश बनकर

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** ऑपरेशन सिंदूरच्या दरम्यान "राष्ट्रप्रथम" मानून देशसेवेचे कर्तव्य बजावणारे लोणवाडी येथील सैनिक माणिक एकनाथ सुलताने यांचे आज सिल्लोड येथे सत्कार करून सन्मान करण्यात आला. पहलगाम येथे दहशतवाद्यांनी निष्पाप नागरिकांची जात विचारुन केलेल्या हत्या घृणास्पद व मनाला चीड आणणारी आहे याचाच बदला म्हणून भारतीय सैनिकांच्या तिन्ही दलामार्फत सडेतोड उत्तर देऊन थेट दहशतवाद्यांची तळ उध्वस्त व पाकिस्तान दहशतवादाला भूतो ना भविष्य असा धडा



शिकवला. या मोहिमेचे नाव ऑपरेशन सिंदूर असे होते. याचेच एक साक्षीदार म्हणून लोणवाडी तालुका सिल्लोड येथील सैनिक माणिक एकनाथ सुलतानी हे सुट्टीवर घरी आले असता त्यांचा भारतीय जनता पार्टी सिल्लोड सोयगाव च्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांनी ऑपरेशन सिंदूर च्या प्रसंगी काढणारी चित्त थरारक अनुभव सांगितले. ते देशाची मान गर्वाने उंचावणारे होते. ते ऐकून खूप अभिमान वाटला.असे भाजपा प्रदेश सचिव सुरेश बनकर यांनी सांगितल देशाचे कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या आत्तापर्यंतच्या अकरा वर्षाच्या कार्यकाळात सैन्यासाठी मुबलक अशा सुविधा उपलब्ध झाल्यामुळे भारतीय सैन्य हे जगाच्या पातळीवर कणखर व सक्षम असे बनले असेही सैनिक माणिक एकनाथ सुलतानी यांनी सांगितले.

यावेळी भाजपा अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, भाजपा किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस मकरंद कोरडे, भाजपा जिल्हाउपाध्यक्ष सुनील मिरकर, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य अशोक तायडे, सिल्लोड शहराध्यक्ष मनोज मोरेल्लू, कमलेश कटारिया, माजी नगरसेवक विष्णू काटकर, भवन मंडळाध्यक्ष एकनाथ हिवाळे, राजेंद्र दांडगे, देवलाल दुधे,किरण शिरसाट, अतुल साळवे, अरुण राठोड, स्वप्निल शिनगारे, अमोल कुलकर्णी, योगेश साळवे, भाऊसाहेब सुलताने यांच्यासह लोणवाडी येथील सर्व सहकारी , पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकार संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त , राज्यस्तरीय ऑफलाइन स्पर्धा परीक्षा गुणवंत विद्यार्थी सत्कार,

### 9 जूनला शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे होणार कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

माजी खासदार डॉ खुशाल बोपचे, मुख्य संपादक दशरथ सुरडकर, जटा टीव्हीचे निखिलेश कांबळे उपस्थित राहणार

भंडारा- प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व विदर्भ विभागीय दैनिक माझा मराठवाडा वर्तमानपत्राचे संपादक संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त 9 जून 2025 ला दुपारी 3 वाजता राज्यस्तरीय घेण्यात आलेल्या ऑफलाइन सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रथम ,द्वितीय ,तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार , विविध सामाजिक क्षेत्रातील 70 कार्यकर्ते त्यात प्रामुख्याने 50 कार्यकर्त्यांचा सन्मानचिन्ह ,सन्मान प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ व मानाचा फेटा बांधून सत्कार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे 21 सामाजिक कार्यकर्त्यांना भारतीय संविधान ,सन्मान प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन दैनिक माझा मराठवाडा चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर छत्रपती संभाजीनगर हे करणार आहेत ..तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी खासदार तथा अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाचे राष्ट्रीय



अध्यक्ष डॉ .खुशाल बोपचे हे राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून शिवशंकर मुंगाटे सरपंच अड्याळ तथा माजी उपसभापती पंचायत समिती पवनी, सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पाटील अड्याळ, संविधान संघर्ष समिती भंडारा जिल्हा चे अध्यक्ष रोशन जांभुळकर, जनता टाईम/ जनता टीव्हीचे मुख्य संपादक निखिलेश कांबळे नागपूर,शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथील संचालक जीवन बोधी बौद्ध नागपूर हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.सदर कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील 70 कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे .त्यात प्रामुख्याने सदानंद धारगावे, अमरकंठ समरीत, अभय रंगारी, रूपचंद रामटेके ,रोशन जांभुळकर ,पंकज वानखेडे ,दुर्गेश राऊत ,प्राध्यापक राजेश नंदपुरे ,डॉक्टर अक्षय कहालकर ,गणेश पारधी, जीवन बोधी बौद्ध ,डी जी रंगारी ,डॉक्टर गणेश मेश्राम ,अशोक वाहने ,शिवशंकर मुंगाटे ,आशिष चेडगे, जयदेव देशमुख ,भावेश कोटांगले, नरेंद्र भाऊ कातोरे ,डॉअर्पण कुमार संघरत्ने,नम्रता बागडे, प्राध्यापक राहुल डोंगरे ,भीमराव टेंभुर्णे ,मनोज चिंचघरे, विजय नंदागवळी ,सतीश सोमकुवर ,दिलीप वानखेडे ,तुळसीराम गेडाम, पोर्णिमा साखरे ग्रामपंचायत अधिकारी अड्याळ,सुनील सूर्यवंशी ,संजय वंजारी ,कुलदीप गंधे ,विलास बांडेबुचे, गुलाब घोडसे, अर्पित मेश्राम, भैयालाल मेश्राम ,अनिल चचाने ,विनय ढोके,प्रशांत बोदेले ,तनुजा नागदेवे, विपिन टेंभुर्णे, विकास टेंभुर्णे ,अमोल थुलकर ,यांच्या समावेश आहे. व राज्यस्तरीय ऑफलाइन स्पर्धेत प्रथम क्रमांक अंकित वसंता लोंदासे , विलास दुर्गेश लोंदासे , सुमेध खुशाल खोपे यांचा सुद्धा सत्कार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे 21 कार्यकर्त्यांना भारतीय संविधान पुस्तक, सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येणार आहे. त्यात प्रामुख्याने नासिकचवरे , श्रीकांत नागदेवे, सोहेल खान ,राजेश मेश्राम , गेडाम,ग्रामपंचायत अधिकारी, राजकुमार राऊत ,पत्रकार विशाल रणदिवे,धनंजय मुलकरवार, प्राध्यापक सुरज सुरज गोंडाने,तलाठी रवींद्र हटवार ,प्राध्यापक शेखर बोरकर, ग्रामसेवक शालिक लुटे, विक्रांत भालाधरे, पत्रकारशशिकांत भोयर, मुनेश्वर बोदलकर, पत्रकार प्रवीण तायडे, पत्रकार संजय दांडगे, पत्रकार जयश्री सोनवणे, पत्रकार गोकुळ सिंग राजपूत, यांचा समावेश आहे .सकाळी 10 ते 2 वाजेपर्यंत समर्पण ब्लड बँक भंडारा यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन व नेत्रसेवा हॉस्पिटल भंडारा यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन पवनी तालुक्यातील शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे अर्पित मेश्राम व मित्र परिवारातर्फे करण्यात आलेले आहे. करिता कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजका तर्फे करण्यात आलेले आहे.

## पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त पनवेलमधील विरूपाक्ष मंदिरात भगवान शिव महाआरतीचे भव्य आयोजन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त पनवेलमधील विरूपाक्ष मंदिरात भव्य शिवमहाआरतीचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. या वेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्याहस्ते महाआरती झाली. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आणि भगवान शंकराची आराधना करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती आहे. यानिमित्ताने राज्यभरात विविध ठिकाणी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्याने आणि समाजसेवा उपक्रमांचा यात समावेश आहे. त्यानुसार पनवेलमधील विरूपाक्ष मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, श्रीनंद पटवर्धन, कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, माजी नगरसेवक गणेश कडू, अजय बहिरा, सुनील बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, रुचिता लोंढे, भाजपचे पनवेल शहर मंडळ उपाध्यक्ष केदार भगत, सरचिटणीस अमित ओझे, रुपेश नागवेकर, रोहित जगताप, सतीश पाटील, संदीप पाटील, देवांशू प्रभाळे, सपना पाटील, स्वाती कोळी यांच्यासह पदधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# शेकापची एक हाक युवकांच्या रोजगारासाठी ; बेरोजगारांच्या उज्वल भविष्यासाठी...बाळाराम पाटील

### बाळू शेठ म्हणजे राजकारण ,जय ,पराजय बाजूला ठेवून सदैव जनसेवा करणारा नेता ..सुदाम पाटील

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

शेतकरी कामगार पक्षातर्फे पनवेल तालुक्यातील बेरोजगार युवक युवतींसाठी रोजगाराची उपलब्धता करून देण्यासाठी भव्य दिव्य असा रोजगार मेळावा ३१ मे रोजी प.जो.म्हात्रे विद्यालय नावडे येथे आयोजित करण्यात आला होता . सत्ताधारी पक्ष बेरोजगार युवकांचा फक्त निवडणुकीसाठी वापर करत असून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी काहीच उपाययोजना करताना दिसत नाही परंतु आज सत्ता नसतानाही सदैव जनतेशी असलेली बांधीलकी कधीच न तुटू देता शेकाप कार्यकर्ता सामान्य जनतेसाठी दिवस रात्र कार्य करत असतो असे माजी






आमदार बाळाराम पाटील सांगत उत्साहात समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करू असे सांगितले . तरुण हा देशाचा भविष्य आहे पण तेच भविष्य जर अंधारमय जीवन जगत असेल तर सत्ताधाऱ्यांचा काय उपयोग असे अतुल म्हात्रे यांनी सांगत रोजगार मिळेल तो पर्यंत शिबीर भरवू व तरुणांना स्वतःला सिद्ध करण्याची संधी देऊ असे सांगितले. शेकाप नेहमीच सामान्य जनतेसाठी आपल्या माध्यमातून जे काही चांगले करता येईल ते करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. आज ४००हुन अधिक युवकांनी या शिबिरात सहभाग घेत आपल्या योग्य संधीचा लाभ घेतला याचे समाधान आहे असे पनवेल चिटणीस राजेश केणी यांनी सांगितले . आपल्या उज्वल भविष्यासाठी आपल्या हक्काच्या रोजगारासाठी परिसरातील युवक युवतीनी या मेळाव्याला दिलेली साथ आम्हाला प्रेरणा देते आणि यासाठी आम्ही सदैव असे उपक्रम करण्यास कटिबद्ध राहू असे माजी नगरसेवक प्रकाश पाटील यांनी सांगितले. अतुल म्हात्रे सरांच्या माध्यमातून या रोजगार मेळाव्यांची सुंदर अशी कल्पना तरुणांना रोजगार मिळवण्यासाठी पुढे आल्याने सर्व शेकाप नेत्यांनी त्यांच्या नेतृत्वाचे विशेष कौतुक केले. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील,काशिनाथ पाटील, माजी नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सतीश पाटील, शेकाप खजिनदार अतुल म्हात्रे, काँग्रेस पनवेल शहर जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील ,जी. आर.पाटील, पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी,विलास पाटील, माजी नगरसेवक प्रकाश पाटील, तेजस्विनी घरत,संदीप पाटील दिघोडेकर आदी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर यांच्या जयंती निम्मित आहिल्या मातेस त्रिवार अभिवादन करण्यात आले.




**दैनिक युवक आधार चे सहसंपादक यांना लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा**
**- दैनिक युवक आधार परिवार**

## पावसाची उघडीप शेतीच्या

### मशागतीच्या कामाला आला वेग

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर**

**शिरुरआनंतपाळ :** गेल्या पंधरा दिवसापासुन पडत असलेल्या अवकाळी पावसाने दोन दिवसापासुन विश्रांती घेतल्याने शेतकरी खरिप हंगामासाठी शेतीची ट्रॅक्टर यंत्राद्वारे शेती मशागतीच्या कामाला वेग दिले आहेत.

मे महिण्याचा बारा चौदा दिवसाचा काळ दररोज वादळी वारा व मेघगर्जेनेसह मोठा पाऊस पडत होता. या पावसामुळे जमीनीत पाणी थांबल्याने शेतीच्या मशागतीत आडचण निर्माण झाली होती. सध्या दोन दिवसापासुन पावसाने उघडीप दिल्याने शेतकरी नागरंटी, पाळी, ञी हानून शेतीची बैल जोडी व ट्रंक्टर यंत्राच्या साह्याने जलद मशागत करत आहेत. हवामान खात्याने दिं. ३० मे ते १० जुन पंर्यंत पावसाचा खंड पडणार असल्याने शेतकर्यांनी शेतातील मशागती करुन घ्याव्यात व पेरणीची घाई करू असे जाहीर केल्याने शेतकरी शेतातील तुराटी,काडी,कचरा वेचुन पेटवुन देत आहेत. तर अवकाळी पावसामुळे शेतात हिरवे गवत उगवल्याने शेतकरी बैलजोडी व ट्रॅक्टर यंत्राद्वारे मशागतीच्या कामात व्यस्त झाला आहे.



## मुस्लिम समाजाच्या सभागृहासमोरील अतिशय वेगळ्या कल्पकतेने संरक्षण भिंत उभी

### जि.प. बांधकाम उपविभागाचे कौशल्य

### आ. शेखर निकम यांच्या माध्यमातून निधी मंजूर

**दैनिक युवक आधार**

**चिपळूण (प्रतिनिधी) :** अतिशय वेगळी कल्पकता... खास डिझाईन...देखणे काम आणि उत्तम दर्जा... अतिशय कमी कालावधीत जिल्हा परिषद चिपळूण बांधकाम विभागाने सव्वा कोटींची रिटेनिगवॉल उभारली आहे. जि.प.चे शाखा अभियंता आशुतोष सरदेसाई याच्या अधिपत्याखाली उभी राहिलेली देखणी रिटेनिगवॉल जि.प.च्या इतिहासातील पहिलीच असून करोडोची कामे करणाऱ्या सरकारी यंत्रणेसमोर एक आदर्शवत विकासकाम जि.प.च्या अधिकाऱ्यांनी ठेवले आहे.

करोडोचे काम म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पाच पंचवीस लाखाचे काम जिल्हा परिषद असे समीकरण अनेक वर्षे सुरू आहे. मात्र, जिल्हा परिषदेच्या एका कामाने हे समीकरण खोटे पाडले आहे आणि आम्हीही कोटींची कामे सहज करू शकतो हे दाखवून दिले आहे. शहरातील बायपास मार्गावर लाईफकेअर रुग्णालयच्या बाजूच्या डोंगरावर मुस्लिम समाजाचे अतिशय भव्य सभागृह उभारले जात आहे. बहुतांशी काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. याचं ठिकाणी रस्त्याच्या बाजूला सभागृहाच्या सुरक्षतेसाठी आ. शेखर निकम यांनी पंचवीस पंधरा मूलभूत सोयी सुविधा योजनेतून सव्वा कोटी रुपयांचा निधी संरक्षण भिंतसाठी आणला गेला. राज्यात प्रथमच या एका कामासाठी या योजनेतून निधी मिळाला तो फक्त चिपळूणला आणि एवढा मोठा निधीही प्रथमच एका कामासाठी जिल्हा परिषद चिपळूण बांधकाम विभागाला आला. वर्दळीच्या ठिकाणी असणारी ही संरक्षणभिंत तब्बल बारा मीटर उंच आणि ३२ मीटर लांबीची असल्याने येथील शाखा अभियंता आशुतोष सरदेसाई यांनी उपअभियंता श्री. मेश्राम याच्या मार्गदर्शनानुसार अतिशय उत्तमदर्जाचे काम करून घेतले. मुळात एवढे मोठे काम प्रथमच जिल्हापरिषदेकडे आले होते. खास करून आ. शेखर निकम यांनी मुद्दामहून जि.प.कडे दिले होते आणि येथील अधिकाऱ्यांनी हे आव्हान



लीलया पेलले. शाखा अभियंता श्री. सरदेसाई यांनी आरसीसीचे खास वेगळे डिझाईन तयार केले. भिंत दिसताना सुरेख दिसली पाहिजे आणि तिचा दर्जाही उत्तम असला पाहिजे याची काळजी घेत उत्तम काम उभे केले असून या ठिकाणी कार्यकरि अभियंता यांनी भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांचे कौतुक केले. आ. शेखर निकम यांनीही पाहणी करून समाधान व्यक्त करीत अधिकाऱ्यांचे कौतुक केले आहे. जिल्हापरिषदेच्या इतिहासातील हे पहिलेच काम असून करोडोची कामे करणाऱ्या यंत्रणेला हम् भी कुछ कम नही हे दाखवून दिले आहे.

## पाणी योजनांच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करा- उमा घारगे पाटील

### कापसाळ येथे पार पडले दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण,(प्रतिनिधी)**

ग्रामिण भागात मुबलक पाणी पुरवठा होण्यासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून जलजिवन मिशन योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या योजना दिर्घकाळ टिकण्यासाठी यासंबंधी नियुक्ती केलेल्या समितीचे योगदानही तितकेच महत्वाचे आहे. दीर्घकालीन संसाधनाच व्यवस्थापन करण्यासाठी पाणी योजनांचे स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण करणे ही काळाची गरज आहे. शाश्वतता केवळ पर्यावरणाशीच संबंधित नसून, सध्याच्या आणि भविष्यातील जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी शाश्वतता एक आवश्यक भाग आहे, असे प्रतिपादन गट विकास अधिकारी सौ. उमा घार्गे – पाटील यांनी कापसाळ येथील प्रशिक्षण शिबीरात केले.



जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायत स्वच्छता समिती मधील पदाधिकारी व कर्मचाऱ्यासांठी स्त्रोत बळकटीकरण व शाश्वती करण्यासाठी दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षणाचे आयोजन कापसाळ येथील माटे सभागृहात नुकतेच केले होते. गटविकास अधिकारी उमा घार्गे पाटील यांच्या हस्ते याशिबीराचा शुभारंभ झाला. या शिबीरास ग्रामपंचायत स्तरावरील स्वच्छता समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, जलसुरक्षा रक्षक, रोजगार सेवक यांना निमंत्रीत केले होते. यावेळी मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी घार्गे पाटील म्हणाल्या, येथे मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. तरीही काही ठिकाणी उन्हाळ्याच्या कालावधीत पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. त्यासाठी गावोगावी शाश्वत जलस्त्रोत निर्माण करण्याची गरज बनली आहे. कोट्यावधीच्या पाणी योजना केल्या तरी त्यासाठीचा आवश्यक पाणीसाठी गावातच उपलब्ध करायला हवा. पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यासाठी सामुहिक प्रयत्न व्हायला हवेत. पुर्वी ग्रामिण भाग वड पिंपळ सारखी झाडे मोठ्या प्रमाणात होती. ही झाडे जमिनीत पाणी साठवून ठेवण्यासाठी मोलाची मदत करतात. त्यामुळे वड पिंपळ सारख्या रोपांची लागवड करून त्याचे जतन करायला हवे. गावातील जलस्त्रोत बळकट झाल्यास ग्रामस्थांना पुरेसा पाणी पुरवठा होण्यास व्यत्यय येणार नाही. त्याचबरोबर पाणी योजनांच्या दुरूस्तीचे योग्य व्यवस्थापन केल्यास त्या दिर्घकाळ टिकण्यास मदत होईल. यावेळी गट विकास अधिकाऱ्यांच्या हस्ते जागतिक पर्यावरण दिनाच्या औचित्य साधून वडाचे व कांदळवन रोपाचे वाटप करण्यात आले. तसेच शासनाकडून उपलब्ध झालेले रासायनिक फिर टेस्ट किट चे ग्रामपंचायतींना वितरित करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी स्वप्निल कांबळे व गट संसाधन केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.







पनवेलः भारतीय जनता पार्टी प्रितम जनार्दन म्हात्रे जनसंपर्क कार्यालयात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला मा.नगराध्यक्ष श्री.जे एम. म्हात्रे साहेब यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.


या प्रसंगी मा.नगरसेवक श्री.गणेश कडू , श्री.सुनील बहिरा, श्री.रवीशेठ पाटील, श्री.डी.पी. म्हात्रे साहेब, सौ.प्रीती जॉर्ज, डॉ. सौ. सुरेखा मोहोकर, डॉ. शांताराम नाईकडे सर, युवानेते श्री.मंगेश अपराज, श्री.प्रदीप आंग्रे, श्री.जॉनी जॉर्ज व कार्यकर्ते उपस्थित होते.
( छायाचित्र दैनिक युवक आधार)

## संशोधनासाठी संकेतला ETH झुरिच, स्वित्झर्लंड , विद्यापीठाची शिष्यवृत्ती

### भारतीय विज्ञान संस्थेत भूकंप अभियांत्रिकी विषयात पीएच.डी.

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

वाशीम स्थानिक लाखाळा येथील चि. संकेत नारायण बाजड या विद्यार्थ्याला भूकंप अभियांत्रिकी (सिस्मॉलॉजी) या विषयात पीएच.डी. करण्यासाठी जागतिक दर्जाची स्वित्झर्लंडमधील झुरिच विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी पात्र ठरला आहे. विशेष म्हणजे तो आधीच भारतीय विज्ञान संस्थेत बंगलोर अशा महत्त्वाच्या ठिकाणी संशोधन करत आहे. जागतिक दर्जाची स्वित्झर्लंड येथील जागतिक क्रमवारीत सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ETH झुरिच या विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी तो पात्र ठरला आहे. या अगोदर त्याला भारतात मानाची समजली जाणारी पीएमआरएफ (प्राइम मिनिस्टर रिसर्च फेलोशीप) चा मानकरी ठरलेला आहे. संकेतने यापूर्वी दोन वेळा अमेरिका येथे पेपर प्रेझेंटेशन/ अभ्यास दौरा पूर्ण केलेला आहे. आजपर्यंत त्याने एक रिसर्च पेपर प्रकाशित केलेला आहे, काही रिसर्च पेटेन्ट साठी सुद्धा सादर केले आहेत. संकेत नारायण बाजड हा विद्यार्थी पीएचडी चा अभ्यासक असून सद्या तो संगणकीय भूकंपशास्त्र प्रयोगशाळा, पृथ्वी विज्ञान केंद्र, भारतीय विज्ञान संस्था, बंगलोर येथे संशोधन करत आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगलोर ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. तिच्या 2021




रँकिंगनुसार जगातील ती नं. 1ची संशोधन संस्था आहे. उल्लेखनीय म्हणजे माजी विद्यार्थ्यांमध्ये सुधा मूर्ती, डॉ. के. शिवन (इस्त्रोचे अध्यक्ष), व्हीके आत्रे आणि बरेच आहेत. तर डॉ.सी.व्ही.रामन, सी.एन. आर.राव आणि सतीश धवन यांसारख्या प्रसिद्ध व्यक्तींनी संस्थेला प्राध्यापक म्हणून काम केले आहे. संकेतने दहावीपर्यंतचे शिक्षण एस.एम.सी. इंग्लिश स्कूल वाशीम येथे पूर्ण केले. त्यानंतर त्याने राजस्थान महाविद्यालयात उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. बारावीनंतर पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयात सिव्हिल इंजिनिअरिंग बी.टेक. मध्ये प्रवेश घेतला. पदवीच्या तिसऱ्या वर्षातच त्याने गेट ह्या उच्च शिक्षण प्रवेशासाठी महत्त्वाच्या परीक्षेची तयारी सुरू केली. सन 2021 मध्ये त्याने गेट दिली आणि सिव्हिल इंजिनिअरिंग श्रेणीमध्ये 975 वे अखिल भारतीय रँक मिळवले. यासाठी त्या काळात करोनाचे संकट त्याच्यासाठी वरदान ठरले आणि गेट च्या तयारीवर लक्ष केंद्रीत करण्यास संकेतला पुरेसा वेळ मिळाला. त्यामुळे भारतीय विज्ञान संस्थेत प्रवेश मिळविण्याचा त्याचा मार्ग मोकळा झाला. संकेतचा मोठा भाऊ केतन हा सुद्धा आयआयटी पवई मुंबई या नामांकित संस्थेतून पीएच. डी. करत आहे. त्याचे वडील नारायणराव बाजड हे इंजिनिअर असून, नावली ता. रिसोड अशा अगदी ग्रामीण भागातून येऊन उच्चशिक्षण क्षेत्रात मोठी झेप घेणाऱ्या या दोन्ही भावंडांचे जिल्ह्यात कौतुक होत आहे. त्यांनी आपल्या या यशाचे श्रेय आई–वडिलांना आणि गुरूजनांना दिले आहे.

## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विशाल कार्याची प्रेरणा घेऊन समाजात योगदान देणाऱ्या महिलांचा १जुन२०२५, रोज रविवारी सकाळी सन्मान व पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**श्री शिवाजी वाघमारे पत्रकार चिखली**
**पुणे प्रतिनिधी**

**पिंपरी -** चिंचवड येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विशाल कार्याची व जनसेवेचया स्मरणार्थ सखी-सोबती फाउंडेशनच्या वतीने अहिल्या पुरस्कार २०२५ गौरव समारंभ आयोजित करण्यात आला आहे उद्या दि.१जुन रोज रविवारी सकाळी १०:३० वाजता प्रा.रामकृषण मोरे स नाट्यगृह चिंचवड येथे हा कार्यक्रम होणार आहे

पुणे जिल्ह्यातील समाजसेवा प्रशासन, क्रीडा ,संस्कृती आणि स्त्री सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तसेच शिक्षण, उद्योग व व्यवसाय या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव व सत्कार करण्यात येणार आहे आणि पूरसकार देण्यात येईल असे जाहीर केले आहे अशी माहिती सखी सोबती फाउंडेशनच्या अध्यक्षा गिरीजा शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन अशी माहिती दिली आहे अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन समाजात योगदान देणाऱ्या



महिलांचा सन्मानित करने हा या पुरस्कारा मागिल मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले आहे या वेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विशाल जयंती महोत्सव साजरा करण्यात येईल जयंती महोत्सवाचे संयोजक तथा माजी नगरसेवक. विजय शिंदे,सुचेता गांगल,सोनल वाल्हेकर, श्रीमती प्रभावती इंदलकर, मुग्धा बोरकर, सायली काणे, हर्षदा जोशी, अश्विनी फुलपगार,आदि उपस्थित होते या सन्मान सोहळ्यात एकुण ९ महिलांचा गौरव करण्यात येणार आहे १) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर धर्मशिलता पुरस्कार - हे.भ.प. पूनम जाधव प्रसिद्ध किर्तनकार २) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रजावत्सल पुरस्कार - डॉ.कुंदाताई भिसे संस्थापक-अध्यक्षा उन्नती सोशल फाउंडेशन ३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर न्यायप्रिय शासिका पुरस्कार - पोलिस उपायुक्त स्वप्ना गोरे ४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्तीचे प्रतीक पुरस्कार -श्री शिव छत्रपती पुरस्कार विजेत्या शिल्पागौरी गणपुले ५) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्कृष्ट समाज सेविका पुरस्कार -सुनिता आपटे, सुनीता भोसले, प्राजक्ता खारकर, रेखा मराठे इत्यादी मान्यवर महिला आहेत या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र कार्यकारणी सदस्य निलेश गद्रे, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, भोसरी विधानसभा भाजपचे आमदार महेश दादा लांडगे , चिंचवड विधानसभा आमदार शंकर जगताप आणि विधान परिषद आमदार अमित गोरखे हे उपस्थित राहणार आहेत महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ, भाजपच्या महिला मोर्चाच्या अध्यक्षा चित्रा वाघ, राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार, चिंचवडच्या माजी आमदार अश्विनी जगताप, विधान परिषद आमदार उमाताई खापरे, सामाजिक कार्यकर्त्या मोनिका मोहोळ, शुभांगी जगताप,शिवाजी, सखी मंचच्या अध्यक्षा पुजा लांडगे इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत

## घरट्याच्या धांदलीत दंग ; रेवदंडा, चौल, फणसाड परिसरात सुगरण पक्ष्यांची घडामोड

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

वळिवाच्या पावसाने निसर्ग जागा झाला... आणि सुगरण पक्ष्यांची लगबग पुन्हा एकदा नजरेत भरतेय! यंदा मे महिन्याच्या अखेरीस अवकाळी पावसाच्या सरी कोकणात अवतरल्या आणि त्यामुळे रेवदंडा, चौल, फणसाड वनपरिक्षेत्र तसेच आजूबाजूच्या डोंगराळ परिसरात निसर्गाने पुन्हा एकदा रंगांची उधळण सुरू केली आहे. ओलसर हवामान, पानाफुलांतून पाझरणारे पाणी, आणि झाडाझुडपांनी नटलेले परिसर यात सध्या सुगरण पक्ष्यांची घरटे बांधण्याची धांदल सुरू आहे.फणसाड अभयारण्याच्या सीमाभागातील झाडांवर, रेवदंडा परिसरातील पाणथळ भागांमध्ये आणि चौल गावाच्या बाहेर डोंगर उतारांवर यंदा सुगरण पक्ष्यांनी वेळेआधीच घरटी बांधायला सुरुवात केली आहे. वळवाच्या भरघोस पावसामुळे या पक्ष्यांना अनुकूल हवामान आणि भरपूर साहित्य उपलब्ध झालं आहे. त्यामुळे या परिसरात अनेक झाडांच्या फांद्यांवर एकापेक्षा एक सुबक, कलात्मक घरटी पाहायला मिळत आहेत. नर सुगरण पक्षी आपल्या चोचीने आणि नखांनी गवताच्या भक्कम गाठी बांधत घरटे विणतो. त्याच्या घरट्याला सुबकता आणि सौंदर्य यांचा मिलाफ असतो. मादी पक्षी त्या घरट्याची बारकाईने पाहणी करते आणि पसंती दिल्यावरच त्यात प्रवेश करते. नंतर दोघे मिळून त्यात मऊ पिसं, गवताचे तुकडे, छोटे



कापडाचे काप वगैरे वापरून पिलांसाठी उबदार घर तयार करतात.या निसर्गनाट्याचे साक्षीदार होण्यासाठी पक्षीप्रेमींनी फणसाडच्या डोंगररांगा, रेवदंड्याचा सागरी किनारा, आणि चौल गावच्या सभोवतालचा परिसर पाहायला हवा. या सर्व भागांमध्ये सध्या सुगरण पक्ष्यांच्या घरट्यांची चळवळ, त्यांचे गाणे, आणि घरटी सजवण्याचा अचूकपणा अनुभवायला मिळतो.या छोट्या पक्ष्यांची मेहनत, चिकाटी आणि एकमेकांवरील समजूतदार सहकार्य निसर्गाच्या अद्भुत रचनेचा सुंदर नमुना आहे. हे दृश्य पाहणं म्हणजे एक जिवंत अनुभव निसर्ग, कष्ट, आणि आपुलकी यांचं सुंदर संगम.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवस अमृत महोत्सवानिमित्त युवा मोर्चाचा रक्तदान उपक्रम

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी )



दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ०२ जून रोजी ७५ व्या वर्षात पदार्पण करणार आहेत. त्या अनुषंगाने अमृत महोत्सव वर्षनिमित्त विविध कार्यक्रमे आयोजित करण्यात येणार असून त्यातील एक भाग म्हणून भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रायगड जिल्ह्यातील रक्ततुटवडा भरून काढण्यासाठी एक विशेष "रक्तदान उपक्रम" सुरु करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत दर महिन्याच्या पहिल्या रविवारी एक भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. हा उपक्रम संपूर्ण वर्षभर राबविण्यात येणार असून, विशेषतः थॅलेसिमिया ग्रस्त रुग्णांसाठी आणि इतर गरजू रुग्णांसाठी या रक्तदान उपक्रमाचे मोठे योगदान ठरणार आहे. भव्य रक्तदान शिबिर हा कार्यक्रम केवळ सामाजिक भानातून नव्हे तर एक प्रकारचा मानवतेचा महोत्सव म्हणून साजरा होत आहे. माननीय माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजसेवा, आरोग्य व जनकल्याणाचे कार्य आपल्या राजकीय जीवनात सातत्याने केले आहे आणि त्याच परंपरेतून हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आणि रक्तदानासाठी विशेष मेहनत घेतली जाणार आहे. त्या अनुषंगाने रविवार दिनांक ०१ जून रोजी या उपक्रमाला नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयात सकाळी ८ वाजता प्रारंभ होणार आहे, अशी माहिती युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी दिली आहे.

# मोबाईलमध्ये व्हायरस शिरल्याने व्हॉट्सअॅप ग्रुपवर अश्लील संदेशांचा महापूर

## ग्रुप अडमिन आणि नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे

**विंचूर** :- निफाड शहर व तालुक्यातील अनेक व्हॉट्सअॅप ग्रुपवर अलीकडच्या काही दिवसांपासून सायबर भामट्यांकडून अश्लील आणि अति गलिच्छ स्वरूपाचे मेसेज, फोटो, ऑडिओ-व्हिडिओ क्लिप्स पाठवले जात असून, त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण पसरले आहे.

संपूर्ण प्रकारात धक्कादायक बाब म्हणजे, काही नागरिकांच्या मोबाईलवर .APK (अॅन्ड्रॉइड एप्लीकेशन पॅकेज) या फॉरमॅटची लिंक पाठवून त्यांच्या मोबाईलचा ताबा हॅकर्सकडे गेला आहे. ही लिंक एकदा क्लिक करताच मोबाईलमध्ये व्हायरस शिरतो आणि संबंधित व्यक्तीच्या संपूर्ण संपर्क यादीत अश्लील फाईल्स आपोआप पाठवल्या जातात. सायबर भामटे या व्हायरसच्या माध्यमातून मोबाईलमधील वैयक्तिक फोटो, संपर्क क्रमांक, सोशल मीडिया चॅट्स, बँक खाते क्रमांक, क्रेडिट/डेबिट कार्ड तपशील, पासवर्ड्स आदी गोपनीय माहिती चोरून त्याचा गैरवापर करत आहेत. त्यामुळे संबंधित व्यक्तीची समाजात बदनामी होत असून आर्थिक फसवणुकीची शक्यता प्रबळ झाली आहे. ग्रुप अडमिनसाठी सूचना ज्या ग्रुपमध्ये अशा प्रकारचे मेसेज आले असतील, त्यांनी तातडीने त्या मेसेज पाठवणाऱ्या व्यक्तीस ग्रुपमधून रिमूव्ह करावे, "DELETE FOR EVERYONE" या पर्यायाने सर्व मेसेज डिलीट करावेत, इतर सदस्यांना त्वरित सतर्क करावे.



सध्या मोठ्या प्रमाणावर असे व्हायरस अटॅक झाल्याची नोंद असून सायबर पोलिसांकडून तपास सुरु आहे. दरम्यान, नागरिकांनी डिजिटल माध्यमांचा वापर करताना अधिक सावधगिरी बाळगावी, कोणतीही APK लिंक किंवा फाईल आली तरी ती उघडू नये किंवा डाउनलोड करू नये, मोबाईल हॅक झाला असल्यास तातडीने फॅक्टरी रिसेट करावा, बँक खात्याचे पासवर्ड बदलावेत, संबंधित बँकेशी संपर्क साधावा, सायबर क्राईम पोर्टलवर तक्रार नोंदवावी.
**- भास्करराव शिंदे**
**सहाय्यक पोलिस निरीक्षक, लासलगाव**




**दैनिक युवक आधार - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पाटोदा आगार श्री.कैलास विठ्ठल शेंडगे हे वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. यांच्या सेवानिवृत्ती समारंभास उपस्थितीत राहून शुभेच्छा देताना. पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई, संतोष कोल्हे, सोमीनाथ मुळे, शिवाजीराव डिडुळ, सोनवणे दाजी, भागवत गोरे सह इतर**
**(छाया- शेख महेशर ताहेर पाटोदा.)**

## कु.ऐश्वर्या राजेभोसले यांची स्थापत्य अभियांत्रिकी पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**



इंदापूर तालुक्यातील निरगुडे गावाची सर्वसामान्य कुटुंबातील कन्या कु.ऐश्वर्या लक्ष्मण राजेभोसले हिची स्थापत्य अभियांत्रिकी पदी सातारा येथील जलसंपदा विभागत निवड झाली असून तीचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निरगुडे येथे झाले.त्यानंतरचे १०वी.पर्यंतचे शिक्षण श्री लिंबराज माध्यमिक विद्यालय निरगुडे येथे घेतले.टी.सी. कॉलेज बारामती येथून १२वी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्या प्रतिष्ठान कमल नयन बजाज इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी बारामती येथून सिव्हिल इंजिनियरिंगची पदवी मिळविली.इंजिनियरिंग दरम्यान स्ट्रुक्टरल सबजेक्टस चे शिक्षक डॉ.समाधान मोरखडे सर यांचे सिव्हिल इंजिनियरिंग गव्हर्नमेंट एक्सामिनेशन्स बद्दलचे मार्गदर्शन मिळाले.टिसिएस कंपनी मार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या परीक्षेत सहाय्यक कार्यकारी अभियंता पदासाठी निवड झाली असून सातारा येथे नेमणूक झाली आहे. यनिवडीमुळे सणसर निमसाखर,निरगुडे भागातून पै पाहुणे मित्रपरिवार यांच्या कडून तीचे कौतुक करून अभिनंदनाचा तिच्यावर वर्षाव होत आहे.

## राजर्षी शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुल पालोदकर यांचा वृक्षरोपण करून वाढदिवस साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड -** पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे. एक वृक्ष लावून जन्मदिवस साजरा करूया व वृक्ष मोठा होईपर्यंत त्या वृक्षाचे संगोपन करूया तरच आपलं जीवन अमूल्य प्रदूषण मुक्त होईल व शुद्ध हवा मिळू शकेल. ऑक्सीजन मोठ्या प्रमाणात मिळेल. वृक्षारोपण वृक्ष संवर्धन "एक वृक्ष आरोग्य स्वस्थ" या गोष्टीचा संकल्प मनाशी धरून पालोद येथील तरुण शिव गणेश मित्रमंडळातर्फे सिल्लोड येथील राजश्री शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुल पालोदकर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री गजानन महाराज मंदिर पालोद परिसरात विविध प्रकारचे रोपटे लावून वाढदिवस साजरा करण्यात आला.
यावेळी गौरव डमाळे, संतोष पालोदकर, दिपक सपकाळ, किशोर ढेपले, गौसखा पठाण, पवन वाघ, विशाल मोरे, लक्ष्मण काटकर, वैभव उघडे, नवनाथ जाधव आदींची उपस्थिती होती.



# आगामी दीपावलीचा "आकाश दिवा " घरकूल लाभार्थ्यांच्या स्वत :च्या घरात लागावा.. आ.सुरेश धस

## " दिवाळी नवीन घरकुलात.". यासाठी कार्यशाळेचे आयोजन..

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :-**
**मारुती सत्रे**

ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या घरकूल योजनेअंतर्गत सर्वसामान्य लाभार्थ्यांच्या स्वतःच्या नवीन घरात दिवाळी साजरी करून त्यांच्या जीवनात नवचैतन्य व भरभराटी व्हावी अशी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भावना असून ..त्यानुसार.. आगामी दीपावलीचा आकाश दिवा, आणि पणती घरकूल लाभार्थ्यांच्या स्वतःच्या घरात लागावा असा मानस आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला...
आष्टी येथील भैरवनाथ मंगल कार्यालयात आयोजित ग्रामविकास व पंचायत राज विभाग जिल्हा परिषद बीड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड यांच्यावतीने येणारी.. " दिवाळी नवीन घरकूलात" "या अभियानांतर्गत.. आष्टी, पाटोदा, शिरूर (कासार) या तीन ही तालुकास्तरीय कार्यशाळेत आमदार सुरेश धस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील, सहाय्यक संचालक डी.बी. क्षीरसागर,आष्टी गटविकास अधिकारी जी. व्ही.बागलाने,पाटोदा गटविकास अधिकारी वानखेडे,नलावडे, सभापती



बद्रीनाथ जगताप,जेष्ठ नेते भाऊसाहेब भवर, विनायक जंजिरे आदी उपस्थित होते.
यावेळी बोलताना आमदार धस म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांची ही अतिशय महत्त्वाची घरकुलाची योजना आहे. आपल्या मतदारसंघात जे अपूर्ण कामे आहेत ते लवकर लवकर पूर्ण करावेत.
ग्रामरोजगार सेवकांनी सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या लाभार्थ्यांची पिळवणूक थांबवावी असे सक्त आदेश देऊन अधिकारी व ग्रामसेवक यांनी या घरकुल योजनेत होणाऱ्या पुरवणुकीत लक्ष देऊन स्वतः जबाबदारीने काम करावे यशवंत चव्हाण घरकुल योजनेत मतदार संघात 28 हजार घरकुले मंजूर आहेत. यामध्ये अनियमितता दिसून येत असल्याने बोगस मंजूर झालेल्या घरकुलाची चौकशी लावून पारदर्शकता आणू या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना माहिती देणार आहे. नवीन घरकुलाच्या सर्व्हेमध्ये देखील कोणताच लाभार्थी वंचित ठेऊ नका. नवीन मंजूर असलेले प्रशासनाच्या माध्यमातून आपण सर्व घरकुले पुर्णत्वास घेऊन जाऊ. सर्वसामान्य हा घरकुलाचा लाभार्थी असतो त्यासोबत कंत्राटी कर्मचारी यांच्या वागणुकी बरोबर नाहीत. त्यांनी त्या येणाऱ्या काळात सुधाराव्यात अन्यथा मी वेगळा निर्णय कंत्राटी कर्मचाऱ्याबाबत घेईल असा इशारा दिला मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने साहेब यांचे देखील मी कौतुक करतो की त्यांनी पदभार स्वीकारताच प्रलंबित असलेले दहा हजार घरकुले मार्गी लावले. येणाऱ्या दिवाळीपर्यंत आपल्याला सर्वांना मिळून माझी माय माऊली नवीन घरकुलात आणायची आहे हे ध्येय ठेवून काम करायचे आहे. असे सांगत वैयक्तिक लाभांच्या योजनांचे हजेरी पत्रक तात्काळ भरावे आहे असे शेवटी सांगितले.
यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने म्हणाले की,लोकप्रतिनिधी आम्हाला सहकार्य करत आहेत.बीड जिल्ह्यात 1 लाखा पेक्षा जादा घरे मंजूर आहेत.फेब्रुवारी पासून 9500 हजार घरकुले पुर्णत्वास नेले आहे.आणखी 50 हजार घरकुले येणाऱ्या दिवाळी पर्यत पूर्ण करायचे आहेत. या पार्श्वभूमीवर आजची ही जिल्ह्यातील पहिली कार्यशाळा आपण आयोजित केली आहे. या दिवाळीपर्यंत येणाऱ्या दिवाळीपर्यंत जो लाभार्थी घरकुलाचे अतिशय उत्कृष्ट असे काम करेल त्या लाभार्थ्याच्या घरी आमदार सुरेश धस व मी स्वतः फराळासाठी येईल. आपण जी आज प्रतिज्ञा घेतली आहे त्या प्रतिज्ञाप्रमाणे लाभार्थी यांनी घरकुलाचे काम दिवाळी पर्यंत पूर्ण पूर्णत्वास न्यावेत व ही येणारी दिवाळी नवीन घरात व्हावी अशी भावना जीवने यांनी यावेळी शेवटी बोलताना व्यक्त केली. यावेळी प्रकल्प संचालक संगीता पाटील म्हणाल्या,पहिली कार्यशाळा आष्टी तालुक्यात घेण्याचा मान मिळाला आहे.चांगली व दर्जेदार घरकुले बांधा,दिशा पाहून घरकुले बांधा.आपण सगळे मिळून दिवाळीचा पहिला दिवा लाभार्थी यांच्या नवीन घरात लावायचा आहे. यावेळी आयोजित कार्यशाळेत मतदारसंघातील सरपंचांच्या समस्या जाणून घेत येणाऱ्या काळात सोडविण्ययाचे आश्वासन आ.धस यांनी दिले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकरसर यांनी केले तर आभार पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बाळासाहेब जायभाये यांनी मानले. यावेळी मतदार संघातील सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत अधिकारी, घरकुल विभाग अधिकारी व कर्मचारी, नरेगा विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेसह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**"घरकुल नियंत्रण कक्षाद्वारे मदत...!"**
**आष्टी पंचायत समिती कार्यालयामध्ये घरकुल विभाग करिता स्वतंत्र नियंत्रण कक्ष सुरू करत, घरकुलाच्या बाबतीमध्ये येणाऱ्या अडचणीवर जिल्हा परिषद गट नुसार अधिकाऱ्यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करून तातडीने अडचणी सोडवत दिवाळीपूर्वी घरकुलाची कामे पूर्ण होतील यासाठी या माध्यमातून मदत केली जाणार आहे.**

# कामगार नेते संतोष पवार यांच्या अमरण उपोषणाची यशस्वी सांगता

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

राज्यातील हजारो कामगार , कर्मचारी, संवर्ग कर्मचारी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न प्रदिर्घ काळापासून प्रलंबित होते या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी निवेदने , धरणे, मोर्चे , कामबंद आंदोलने अशी विविध आंदोलने झाली परंतू प्रश्न प्रलंबित राहिल्यामुळे हजारो कामगारांचे न भरून निघणारे नुकसान होत होते या गंभीर परिस्थितीकडे महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने मुख्य संघटक कामगार नेते संतोष पवार यांनी दि.26 में 2025 पासून आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण सुरु केले होते, या अमरण उपोषणाची सांगता उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे प्रधान सचिव एन. नवीन सोना यांची शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांना वस्तुस्थिती व व्या गंभीर प्रश्नाचे गांभीर्य सांगितले,त्यावेळी श्री सोना साहेब यांनी या विषयाचे गांभीर्य लक्षात घेत नगरविकास विभाग आणि नगरपालिका प्रशासन संचालनालय यांनात्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली आणि उच्च स्तरीय बैठक तातडीने आयोजन करण्यात येईल असे अभिवचन दिले त्यानंतर




दि. २६ मे २०२५ रोजी आझाद मैदान येथे सुरू झालेल्याकामगार नेते संतोषपवारयांच्या आमरण उपोषणाची सांगता लाखो राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे ज्येष्ठ कामगार नेते सन्माननीय विश्वास काटकर यांच्या शुभहस्ते कामगार नेते संतोष पवार यांना जुस देऊन करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मा. मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री श्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी दि. 20 मार्च 2020 रोजी राज्याचे मुख्य सचिव मनुकूमार श्रीवास्तव, वीत्त विभाग सचिव ओमप्रकाश गुप्ता, नगरविकास विभाग प्रधान सचिव श्रीमती सोनिया सेठी मॅडम, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव श्री सुमंत भांगे आणि नगरपालिका प्रशासन संचालनालयाचे आयुक्त तथा संचालक डॉ किरण कुलकर्णी यांच्या उपस्थितीत जे निर्णय 2 वर्षांपूर्वी घेण्यात आले होते त्याची अंमलबजावणी तसेच काही ईतर प्रस्ताव जे मा. मनोज रानडे साहेब, आयुक्त तथा संचालक, नगरपालीका प्रशासन संचालनालयाकडून, वेळोवेळी प्रस्तावित केलेली प्रकरणे मंजूर करण्यासाठी संघर्ष समितीच्या वतीने सातत्याने लेखी, तोंडी सर्व पद्धतीने आणि याबाबत कामगार नेते संतोष पवार यांनी प्रत्यक्षात पाठपुरावा करूनही राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायती मधील कर्मचारी, संवर्ग कर्मचारी यांचे प्रश्न प्रदिर्घ काळापासून नगरविकास विभाग मंत्रालय येथे प्रलंबित होते.

जे प्रश्न वीत्त विभागाशी संबंधित होते त्याबाबत वरिष्ठ स्तरावरून चर्चा होत नसल्यामुळे आणि महत्वाचे म्हणजे या आर्थिक प्रश्ना बाबत नगरविकास विभाग आणि वीत्त विभागामध्ये समन्वयाचा आभाव सतत जाणवत होता आणि त्यामुळे चर्चा होत नसल्याकारणाने हे विषय तब्बल दोन वर्ष प्रलंबित राहीले आहेत या संपूर्ण परिस्थितीमुळे कळत नकळत तत्कालीन मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या समवेत उच्च पदस्त आधिकार्यांचा अनावधानाने का होईना परंतू आवमान मात्र झालेला आहे हे नाकारता येणार नाही. यानंतर ज्येष्ठ कामगार नेते अनिल दादा जाधव यांनी अतीशय मेहनत घेतली. डॉ डि एल कराड, अड सुरेश ठाकूर, रामेश्वर वाघमारे, अड सुनील वाळूंजकर, अनिल पवार, यांच्या मार्गदर्शनाखाली हे आमरण उपोषण निश्चित करण्यात आले. गेल्या 4 दिवस आझाद मैदान मुंबईसुरु असलेल्या या अमरण उपोषणाची दखल शासनाने गांभीर्याने घेऊन मंत्रालयीन पातळीवर प्रदिर्घ काळापासून प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि यशस्वी करण्यासाठी शिष्ट मंडळाला पाचारण करण्यात आले सदरच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे प्रधान सचिव एन नवीन सोना यांची भेट घेऊन वस्तुस्थिती सांगितली त्यावेळी बैठकीस गेलेल्या शिष्ट मंडळात प्रामुख्याने प्रा. राजेंद्र मढवी, उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, कामगार नेते कॉ. भूषण पाटील, कार्याध्यक्ष मधूकर भोईर आणि हर्षवर्धन पवार उपस्थित होते शिष्टमंडळाने एन.सोना यांची भेट घेऊन वस्तुस्थिती सांगितली त्यावेळी मात्र सन्माननीय सोना साहेब यांनी या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन नगरविकास विभाग आणि नगरपालिका प्रशासन संचालनालय यांना जबाबदारीची जाणीव करून दिली आणि उच्च स्तरीय बैठक तातडीने आयोजन करण्यात येईलअसे अभिवचन प्रधान सचिवयांनी शिष्ट मंडळालादिले त्यानुसर सदर बैठकीचे आयोजन आयुक्त तथा संचालक नगरपालीका प्रशासन संचालनालय येथे दि.6 जून 2025 रोजी बैठक निश्चित करण्यात आले आहे. त्यानंतर दि. 26 मे2025 रोजी आझाद मैदान येथे सुरू झालेल्या आमरण उपोषणाची सांगता दि.30 मे रोजी लाखो राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे ज्येष्ठ कामगार नेते सन्माननीय विश्वास काटकर यांच्या शुभहस्ते कामगार नेते श्री संतोष पवार यांना जुस देऊन करण्यात आली.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड जिल्हा बॅडमिंटन चॅम्पियनशिप आणि निवड चाचणी स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्त रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आणि योनेक्स सनराइज् यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा बॅडमिंटन चॅम्पियनशिप आणि निवड चाचणी उलवे येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स च्या विस्तीर्ण कोर्टवर आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उदघाटन बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. या स्पर्धेत ९, ११, १३, १५, १७ आणि १९ या वयोगटातील एकेरी तसेच दुहेरी विविध श्रेणीमध्ये स्पर्धा आयोजित केलेली आहे. तसेच २१ वर्षाखालील मुला मुलींसाठी एकेरी स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. यावेळी बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगड चे उपाध्यक्ष रवींद्र भगत, खजिनदार नरेंद्र जोशी, शिवा कराईल, प्रणित गोंधळी, योगेश पाटील, शामनाथ पुंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. तीन लाखाहून अधिक रकमेची रोख पारितोषिके असलेल्या या स्पर्धेमध्ये २०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला आहे.या स्पर्धेचा बक्षीस समारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत २ जून रोजी रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये होणार आहे.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर







